# लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या वेलंकणी तीर्थस्थानासाठी मध्य रेल्वेची विशेष सेवा

## खा. डॉ. संजीव नाईक यांची मागणी मान्य

ठाणे । प्रतिनिधी

तामिळनाडू येथील वेलंकणी या देवीच्या तीर्थस्थानासाठी मध्य रेल्वेतर्फे विशेष गाडी सोडण्यात येणार आहे. खा. डॉ. संजीव नाईक यांनी ही मागणी केली होती.

ठाणे, नवी मुंबई आणि मीरा-भाईंदर या भागातून दरवर्षी हजारो भाविक वेलंकणी देवीच्या यात्रेसाठी जात असतात. मात्र या देवस्थानापर्यंत थेट पोहोचण्यासाठी रेल्वेसेवा उपलब्ध नव्हती. नागपट्टीनम् या जवळच्या रेल्वेस्थानकावरून गाडी पकडून नंतर बसने देवस्थानापर्यंत जावे लागते. यामध्ये भाविकांचा वेळ वाया जातो. आणि हा प्रवासही असुविधा जनक होतो. भाविकांची ही अडचण लक्षात घेऊन खा.डॉ. नाईक यांनी मध्य रेल्वेचे विभागीय महाव्यवस्थापक श्री. कुलभूषण यांची भेट घेतली. आमदार गिल्बर्ट मेंडोसा हे देखील त्यांच्या समवेत होते. खा. डॉ. नाईक यांची ही मागणी रेल्वे प्रशासनाने मान्य केली असून २५ ऑगस्ट आणि २७ ऑगस्ट या दोन दिवशी वेलंकणी देवस्थानसाठी गाड्या सोडण्यात येणार आहेत.

२५ ऑगस्ट रोजी दादर येथून सकाळी ११.१५ वाजता. ही गाडी सुटणार असून २६ ऑगस्ट रोजी दुपारी ११वाजता ती वेलंकणी येथे पोहोचले. २७ ऑगस्ट रोजी सकाळी ८.३०वाजता ही गाडी परतीच्या प्रवासाला निघेल. आणि २८ऑगस्ट रोजी दुपारी सुमारे १२ वाजून ५ मिनिटांनी दादर येथे पोहोचेल. ही गाडी १७ डब्यांची असेल.

दुसरी गाडी २७ ऑगस्ट रोजी सकाळी ११वाजून २०मिनिटांनी लोकमान्य टिळक टर्मिनल्स येथून सुटणार असून ती २८ ऑगस्ट रोजी रात्री ११ वाजता वेलंकणी येथे पोहोचेल. २९ ऑगस्ट रोजी सकाळी साडेआठ वाजता ती गाडी परतीच्या प्रवासाला निघणार असून ३१ ऑगस्ट रोजी दुपारी १२.५ मि.नी ती लोकमान्य टिळक टर्मिनल्स येथे पोहोचणार आहे. ही गाडी २१ डब्यांची असणार आहे.

लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या वेलंकणी देवस्थानासाठी पाठपुरावा करून विशेष रेल्वेसेवा सुरू केल्याबद्दल या देवीच्या भाविकांनी खा.डॉ. नाईक यांचे आभार मानले आहेत.